**Lecture on 'Turn to Research'**

# विद्यार्थ्यांनी संशोधन क्षेत्राकडे वळण्याची गरज

## डॉ. मनोज देव यांचा मौलिक सल्ला

▶▶ जळगाव । प्रतिनिधी

सध्या इंजिनिअर आणि डॉक्टर क्षेत्राकडे वळण्यापेक्षा संशोधन क्षेत्रात फार मोठ्या संधी निर्माण झाल्या असून विद्यार्थ्यांनी संशोधनाकडे वळावे, असा मौलिक सल्ला इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबईचे सायंटिस्ट डॉ. मनोज देव यांनी दिला.

मराठी विज्ञान परिषद व नूतन मराठा महाविद्यालय विज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आज संशोधनाकडे वळा या विषयावर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबई व प्रधानमंत्री रिसर्च फेलोशिप मिळवणारे व नूतन मराठा महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ.मनोज देव यांचे व्याख्यान महाविद्यालयाच्या बोस सभागृहात आयोजित करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे पीजी कॉर्डिनेटर डॉ.के.बी.पाटील हे होते. व्यासपीठावर मराठी विज्ञान परिषदेचे सचिव प्रा. डी एस बारंबे, विज्ञान विभागाचे उपप्राचार्य डॉ.माधुरी पाटील, महाविद्यालयाचे सायन्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रा.आर.बी .देशमुख हे होते.

डॉ.देव यांनी संशोधनाविषयी उत्तर महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी कशा कशा संधी आहेत याचे एलसीडी प्रोजेक्टरवर पावर पॉइंट प्रेसेंटेशन करून एम.एस.सी.च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. केबळ इंजिनिअर व डॉक्टर क्षेत्राकडे वळण्यापेक्षा संशोधनाकडे केवढ्या मोठ्या संधी आहेत याचे स्व उदाहरण देऊन त्यांनी स्पष्ट केले व विद्यार्थी विद्यार्थिनींनी विचारलेल्या प्रश्नाचे अतिशय समाधानकारक उत्तर दिले. पाहुण्यांचा परिचय डॉ.माधुरी पाटील यांनी करून दिला तर आभार प्रा.आर.बी.देशमुख यांनी मानले. विज्ञान विभागातील १२७ विद्यार्थी विद्यार्थिनी कार्यक्रमास उपस्थित होते.